मटा १८/०४/२०१८ पान नं 2

# बँक कर्मचाऱ्यांसाठी ऑनलाइन अभ्यासक्रम

म. टा. प्रतिनिधी, पुणे

बँकिंग व्यवस्थापन क्षेत्रातील देशातील आघाडीची संस्था असलेल्या पुण्यातील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँकिंग मॅनेजमेंटतर्फे (एनआयबीएम) नवीन बँक कर्मचाऱ्यांसाठी नवे ऑनलाइन अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. सर्व बँकांमध्ये नव्याने रूजू झालेल्या सर्वांना त्यांच्याशी संबंधित विषयाचा सहा महिन्यांचा ऑनलाइन अभ्यासक्रम उत्तीर्ण होणे बंधनकारक असून सध्या हा अभ्यासक्रम राबवणारी एनआयबीएम ही पहिलीच संस्था आहे, अशी माहिती 'एनआयबीएम'चे संचालक डॉ. के. एल. धिंग्रा यांनी दिली.

बँकिंग क्षेत्राचे नियमन करणाऱ्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने एक एप्रिल २०१८ नंतर रूजू झालेल्या कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांचे 'ऑनलाइन ई-सर्टिफिकेट कोर्स' करणे बंधनकारक केले आहे. त्याबद्दलचे परिपत्रकही 'आरबीआय'ने जारी केले आहे. आतापर्यंत या अभ्यासक्रमासाठी एक हजारहून अधिक कर्मचाऱ्यांनी नोंदणी केली आहे,' असे डॉ. धिंग्रा म्हणाले.

## नवे अभ्यासक्रम

- रिस्क मॅनेजमेंट
- क्रेडिट मॅनेजमेंट
- ट्रेझरी मॅनेजमेंट
- अकाउंट्स अँड ऑडिट
- रिटेल क्रेडिट मॅनेजमेंट

'सध्या फक्त 'एनआयबीएम'मध्ये हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. हे अभ्यासक्रम संपूर्णतः ऑनलाइन स्वरूपाचे असून दृकश्राव्य माध्यमातून कर्मचाऱ्यांना शिक्षण घेता येईल. परीक्षाही ऑनलाइन माध्यमातूनच घेतली जाईल,' असेही डॉ. धिंग्रा म्हणाले.

एनआयबीएच्या पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मॅनेजमेंट (बँकिंग अँड फायनान्स) अभ्यासक्रमाचा पदवीप्रदान सोहळा आज (बुधवारी) एनआयबीएमच्या सभागृहात होणार आहे. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर एन. एस. विश्वनाथन व सेबी, यूटीआय व आयडीबीआयचे माजी अध्यक्ष एम. दामोदरन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील.